अमेरिकी कॉन्सुल जनरल

श्रीयुत थॉमस  वायडा



मुंबई-स्थितः अमेरिकी सरकारच्या वाणिज्य वकिलातीचा पदभार श्रीयुत थॉमस   वायडायांनी जुलै ३१ रोजी हाती घेतला आहे. आपल्या २३ वर्षाच्या अमेरिकी सरकारच्या नोकरीत, श्री वायडा यांनी अनेक महत्वाची पदं भूषविली आहेत. रंगून (बर्मा) येथील अमेरिकी दूतावासात ते उच्च पदावर होते, त्याचबरोबर त्यांनी दक्षिण कोरिया, बाल्कन देशांमध्ये आणि जर्मनीत काम केले आहे. मुंबईत  येण्याआधी त्यांनी मध्य पूर्वेतील राष्ट्रां-संबंधीच्या परराष्ट्र

खात्यातील विभागाच्या सहसंचालाकाचे काम केले आहे. मध्य पूर्वेतील व उत्तर आफ्रिकेतील देशांना अमेरिकी सरकारची मदत पोहोचवणे व त्या भागातील (विशेषकरून इजिप्ट) राजकीय घटनांचा आणि अरब स्प्रिंग सारख्या उठावांचा मागोवा घेणे हे काम वायडा यांनी केले आहे. त्यापूर्वीही   त्यांनी मध्य पूर्वेतील भागात राजकीय व आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणारे अनेक उपक्रम राबविले आहेत.

वायडा यांनी अमेरिकेच्या नावाजलेल्या  स्टॅनफर्ड विद्यापीठाची स्नातक पद्वी मिळविली आहे, व फ्लेचर  स्कूल ऑफ लॉ एंड डिप्लोमसीयेथे त्यांनी स्नातकोत्तर पदवी प्राप्त केली आहे.

त्यांच्या मुंबईच्या वास्तव्यात त्यांच्या बरोबर आहेत पत्नी एमी सेबेस व  दोन कन्या.